
फक्त सभासदांसाठी

# ६५ वा वार्षिक अहवाल

## २०११-२०१२







# अमर हिंद मंडळ, दादर

**स्थापना : २६ जानेवारी १९४७**

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई-४०० ०२८. दूरध्वनी : २४२२ ३५ ८९.
www.amarhindmandal.com | Email : amarhindmandal@rediffmail.com

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२

### ❖ विश्वस्त ❖


अॅड. मुकुंद तिवरेकर    श्री. दिनकर पाटील

श्रीमती उषा मेहता


| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | श्री. वसंत भालेकर |
| उपाध्यक्ष | : | श्री. रमेश वरळीकर |
| | | श्री. भास्कर सावंत |

### ❖ कार्यकारी समिती ❖

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. दीपक पडते |
| कार्यवाह | : | श्री. अरुण देशपांडे |
| सहकार्यवाह | : | श्री. सतीश रेडीज |
| कोषाध्यक्ष | : | श्री. श्रीकृष्ण राणे |
| सदस्य | : | श्री. संजय पेडणेकर |
| | | श्री. विजय राणे |
| | | श्री. दत्ता सावंत |
| | | श्री. प्रफुल्ल पाटील |
| | | श्रीमती नीलिमा पालकर |
| | | श्रीमती सीमा कोल्हटकर |
| सदस्य (स्वीकृत) | : | श्री. दीपक नाडकर्णी |
| | | श्री. विलास कारेकर |

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १२/०८/२०१२ रोजी दुपारी २.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. वसंत भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

***सभेपुढील कामे :-***

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन २०११-२०१२ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन २०११-२०१२ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४. सन २०१२-२०१३ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५. सन २०१२- २०१३ चे अंदाजपत्रक मंजूर करणे. (परिशिष्ट ब)

६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबत ठराव मंजूर करणे.

७. निवडणूकीचा निकाल जाहीर करणे.

८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

दि. २८/०६/२०१२

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

***अरुण अ. देशपांडे***

कार्यवाह

---

सूचना :-

१) गणपूर्तीचे अभावी नियोजितवेळी सभा सुरु न झाल्यास सभा स्थगित करण्यात येईल, ही स्थगित सभा त्याच ठिकाणी दुपारी २.३० वा. भरेल व ही सभा पूर्णपणे वैध असेल.

२) सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक, संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात बुधवार, दि. ८ ऑगस्ट २०१२ पर्यंत सायं. ६ ते ८ या वेळेत (रविवारव्यतिरिक्त) सादर करावेत.

३) सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदांच्या संबंधितांनी तत्सबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४) सर्वसाधारण सभेसाठी येताना कृपया हा अहवाल सोबत घेऊन यावा.

# अमर हिंद मंडळ, दादर

अमरवाडी, गोखले रोड (उ.), दादर, मुंबई – ४०० ०२८.

(स्थापना : २६ जानेवारी १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६ / २५६–१९४९)

## निवडणूकीचा कार्यक्रम

अमर हिंद मंडळाच्या घटनेप्रमाणे यावर्षी पुढील सहा वर्षासाठी विश्वस्त मंडळावर तीन विश्वस्तांची निवड करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पुढील तीन वर्षासाठी अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीच्या ११ सभासदांची निवड करण्यात येणार आहे. कार्यकारी समितीने या वेळच्या निवडणूकीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून मा. श्री. नितीन देशपांडे यांची नेमणूक केलेली आहे. त्यांना सहाय्यक म्हणून मा. श्री. संजय भाटकर हे काम पाहतील.

निवडणूक अधिकाऱ्यांच्या संमतीने निवडणुकीसंबंधीचा खालील कार्यक्रम सर्व तहहयात सभासदांच्या माहितीसाठी जाहीर करण्यात येत आहे.

१. मंडळाच्या घटनेप्रमाणे पुढील सहा वर्षांसाठी विश्वस्त (३ जागा) तसेच तीन वर्षांसाठी अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) आणि कार्यकारी समितीचे सभासद (११जागा) यांची निवड करण्यात येईल.
इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष येऊन सही करुन उमेदवारी अर्ज घेऊन जाणे बंधनकारक आहे.

२. वरील जागांसाठी भरावयाचे उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत सोमवार, दि. २३ जुलै २०१२ ते शनिवार, दि. २८ जुलै २०१२ रोजी सायंकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत मिळतील.

३. पूर्ण भरलेले उमेदवारी अर्ज मंडळाच्या कचेरीत मंगळवार, दि. ३१ जुलै २०१२ पर्यंत सायं. ७ ते ८ या वेळेत स्विकारण्यात येतील.

४. अर्जांची छाननी बुधवार, दिनांक १ ऑगस्ट २०१२ रोजी सायंकाळी ७ वाजता करण्यात येईल.

५. वैध उमेदवारांचा यादी गुरुवार, दि. २ ऑगस्ट २०१२ रोजी सायंकाळी ७ वाजता जाहीर करण्यात येईल.

६. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख व वेळ, शनिवार, दिनांक ४ ऑगस्ट २०१२ सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील. ज्यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचा असेल त्यांनी लेखी स्वरुपात तसा अर्ज देणे आवश्यक आहे.

७. उमेदवारांची अंतिम यादी सोमवार, दि. ६ ऑगस्ट २०१२ रोजी सायंकाळी ७.०० वाजता मंडळाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

८. विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीचे सभासद यांच्या भरावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवारी अर्ज झाल्यास निवडणूक घेण्यात येईल.

९. निवडणूक रविवार, दिनांक १२ ऑगस्ट २०१२ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत गुप्तमतदान पद्धतीने मंडळाच्या जागेत घेण्यात येईल.

१०. मतदानासाठी पात्र असणारा प्रत्येक तहहयात सभासद ज्या पदांसाठी जितक्या जागा आहेत तितकी मते देवू शकेल. त्यापेक्षा अधिक मते दिल्यास ती मतपत्रिका बाद ठरविण्यात येईल.

११. निवडणूकीसंबंधी कोणतीही तक्रार, तंटा, आक्षेप असल्यास तो लेखी स्वरुपात निवडणूक अधिकाऱ्यांकडे देण्यात यावा. यासंबंधीचा निवडणूक अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम स्वरुपाचा असेल आणि तो सर्वांना बंधनकारक राहील.

१२. निवडणुकीची वेळ संपल्यावर निवडणूक अधिकारी मतमोजणी करुन अंतिम निर्णय सर्वसाधारण सभेत जाहीर करतील.

१३. मतदानास येताना प्रत्येकाने ओळखपत्र (रेशनकार्ड,निवडणूक ओळखपत्र इ.) बरोबर आणणे बंधनकारक आहे.

दि. ३० जून २०१२

अरुणा देशपांडे
कार्यवाह
(कार्यकारी समितीसाठी)

# वार्षिक अहवाल

## (१ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२)

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सादर वन्दे,

मंडळाचा वार्षिक अहवाल जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

दि. २६ जानेवारी २०१२ रोजी मंडळाच्या स्थापनेला ६५ वर्ष पूर्ण झाली. अहवाल काळात मंडळाने अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक उपक्रम, कार्यक्रम आयोजित केले.

मंडळाच्या क्रीडा विभागाने अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला, तसेच खो-खो, कबड्डी, लंगडी या खेळांच्या आंतर शालेय स्पर्धा मंडळाच्या क्रीडांगणावर घेण्यात आल्या.

कै. उमेश शेणॉय स्मृतीदिना निमित्त राज्यपंच मंडळाचे वार्षिक शिबीर घेण्यात आले. या शिबिरात ९१ शिबिरार्थींनी भाग घेतला.

७० वर्षावरील ११ ज्येष्ठ खोखो कार्यकर्त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

मंडळाच्या कलाविभागाने अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला मंडळाचे अनेक कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यासाठी सक्रीयपणे कार्य केले. महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत बालनाट्य सादर केले. सांस्कृतिक अमावस्या, कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा, कै. विनोद हडप राज्यस्तरीय मराठी एकांकिका लेखन स्पर्धा यशस्वीपणे आयोजित केली. विनायक पाटील स्मृतीमंच संस्थेने समाजसेवी संस्थेचा पुरस्कार मंडळाला प्रदान केला.

मंडळ आपल्या परंपरेला साजेसे कार्य करीत आहे आणि मंडळाची समाजसेवी कार्य करणारे मंडळ अशी निर्माण झालेली प्रतिमा वृद्धींगत करण्याचा प्रयत्न करीत आहे.

### मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे :-

**सभा :-** अहवाल कालावधीत समितीच्या १२ सभा झाल्या तर कार्यकारी समिती आणि विश्वस्त यांच्या ०३ संयुक्त सभा झाल्या (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट अ पहावे.)

**मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा :-** मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २३ ऑक्टोबर २०११ रोजी संपन्न झाली. या सभेस एकूण ४५ तहहयात सभासद उपस्थित होते.

**तहहयात सभासद :-** अहवाल काळात नवीन तहहयात सभासद करुन घेण्यात आले नाहीत. मंडळाचे एकूण तहहयात सभासद ४५५ आहेत.

**विगतवारी निधी :-** अहवाल काळात इमारत निधीत १२,५०,०००/-, क्रीडा निधीत ३,००,०००/-, कला निधीत २,५०,०००/- एकूण १८,००,०००/- (रुपये अठरा लाख फक्त) वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था :-** १ जानेवारी २०१२ ते ३१ डिसेंबर २०१२ या कालावधीसाठी "मयुर केटरर्स" यांना संपूर्ण केटरिंग, डेकोरेशन व्यवस्थेसाठी ठेकेदारी देण्यात आली.

***उपक्रम आणि कार्यक्रम :-*** मंडळाची ६४ वी वसंत व्याख्यानमाला रविवार, दि. २३ एप्रिल २०११ रोजी डॉ. उत्तमराव कांबळे यांच्या साहित्य आणि समाज या विषयावरील उद्घाटनपर व्याख्यानाने सुरु झाली. व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि. ३० एप्रिल २०११ रोजी श्री. उपेंद्र भट यांच्या 'कै. भीमसेन जोशी यांना आदरांजली ' या संगीतमय कार्यक्रमाने झाला.

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १ | २२ एप्रिल २०११ | व | वक्ते – डॉ. उत्तमराव कांबळे<br>विषय : साहित्य आणि समाज |
| | २३ एप्रिल २०११ | सं | वक्ते – डॉ. वि. ना. लोखंडे<br>विषय : .....आणि दोन हात |
| | २४ एप्रिल २०११ | त | वक्ते – श्री. माधवराव भिडे<br>विषय : शिक्षणाबरोबरच संपन्नताही हवी |
| | २५ एप्रिल २०११ | व्या | वक्ते – श्री. सुरेश द्वादशीवार<br>विषय : " नक्षलवाद " |
| | २६ एप्रिल २०११ | | वक्ते – बॅरीस्टर शरद पालव<br>विषय : " अणुऊर्जा " |
| | २७ एप्रिल २०११ | ख्या | वक्ते – श्री. संदीप खरे<br>विषय : मौनाची भाषांतरे |
| | २८ एप्रिल २०११ | न | वक्ते – श्रीमती मेघना पेठे<br>विषय : स्त्री व कुटुंबव्यवस्था |
| | २९ एप्रिल २०११ | मा | वक्ते – श्रीमती अचला जोशी<br>विषय : आगळी वेगळी<br>मुलाखतकार – डॉ. शुभा चिटणीस |
| | ३० एप्रिल २०११ | ला | वक्ते – श्री. उपेंद्र भट<br>विषय : कै. भीमसेन जोशी यांना आदरांजली |
| २ | १४ ते २९ एप्रिल २०११ | बालनाट्य प्रशिक्षण शिबीर | संचालिका – लीला हडप, समारोप ३० एप्रिल सकाळी १०.३० श्री. शिवाजी मंदिर, दादर |
| ३ | २ मे २०११ | सांस्कृतिक अमावस्या | "पुन्हा डाव मांडू सखे ग" "वाळूवरची अक्षरे "<br>एकांकिका – सादरकर्ते अमर हिंद मंडळ कलाविभाग |
| ४ | ५ जून २०११ | पर्यावरण दिनानिमित्त आकाशवाणी मुंबई केंद्र | बालनाटिका – सादरकर्ते अमर हिंद मंडळ कलाविभाग |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| ५ | १ जुलै २०११ | सांस्कृतिक अमावस्या | रक्तपर्जन सादर कर्ते<br>बहि:शाल गार्गी – वेध थिएटर्स |
| ६ | १६ ते १७ जुलै २०११ | राज्यपंच मंडळाचे वार्षिक शिबीर | कै. उमेश शेणॉय स्मृतीदिना निमित्त राज्यस्तरीय खोखो पंच मंडळाचे वार्षिक शिबीर सहभाग महाराष्ट्रातील ९१ पंच |
| ७ | १५ ऑगस्ट २०११ | स्वातंत्र्यदिन<br><br>माजी अध्यक्ष कै. म. ज. फडके स्मृती प्रित्यर्थ गुणवंत खेळाडूंचा गुणगौरव | प्रमुख पाहुणे – श्री. रमेश वरळीकर उपाध्यक्ष – अमर हिंद मंडळ<br><br>मंडळाचे खेळाडू आणि कलाकार यांना वह्या वाटप |
| ८ | २८ ऑगस्ट २०११ | वर्षा सहल | सहभाग–ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकारी समिती खेळाडू, कलाकार |
| ९ | २४,२५ सप्टेंबर (प्राथमिक फेरी)<br><br>७ ऑक्टो. २०११ अंतिम फेरी | कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा वर्ष १४ वे<br><br>कै. विनोद हडप एकांकिका लेखन स्पर्धा | प्राथमिक फेरी परीक्षक – सुहास वीरकर, कुणाल लिमये<br><br>परीक्षक – रेखा बडे, संभाजी सावंत, शिरीष लाटकर<br>सहभागी संख्या – ४१<br>प्रमुख पाहुणे – सतीश पुळेकर<br><br>परीक्षक – राजीव जोशी, मनोहर धोत्रे |
| १० | २ ऑक्टोबर २०११ | ज्येष्ठ खोखो कार्यकर्त्यांचा मेळावा | ७० वर्षावरील ११ ज्येष्ठ खोखो कार्यकर्त्यांचा शाल व श्रीफळ देऊन मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत भालेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. |
| ११ | १३ नोव्हेंबर २०११ | कै. उमेश शेणॉय राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा | परीक्षक :प्रा. जगदीश संसारे, श्री. राकेश शिर्के, आश्लेषा रांगणेकर |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमाचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १२ | १७ ते २० जानेवारी २०१२ | आंतर शालेय क्रीडा स्पर्धा खोखो, लंगडी, कबड्डी | उद्घाटन प्रमुख पाहुणे – प्रा. सौ. रश्मी पोकळे, कु. गौरी वाडेकर, सुधीर मस्कर<br>पारितोषिक वितरण प्रमुख पाहुणे – कु. स्नेहल साळुंके, श्री. गणेश शेट्टी, राणाप्रताप तिवारी, सुरेश गांधी |
| १३ | २४ जानेवारी २०१२ | महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा | आली आली हो मुंबादेवी – लेखक, दिग्दर्शक लीला हडप, सादरकर्ते अमर हिंद मंडळ कलाविभाग |
| १४ | २६ जानेवारी २०१२ | प्रजासत्ताकदिन सकाळी ८.०० वा. मंडळाचा ६५ वा वर्धापनदिन सायं. ७ वा. | प्रमुख पाहुणे – मा. डॉ. विठ्ठल प्रभू<br>ओम प्रस्तुत सांजरंग<br>हिंदी – मराठी वाद्यवृंद |
| १५ | १६,१७ फेब्रुवारी २०१२ | समाजसेवी उपक्रम | मुक्काम – आदे, पोष्ट – नरवण, तालुका – महाड जिल्हा रायगड, मु. पो. देव्हारे, ता. मंढणगड, जि – रत्नागिरी येथील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप |
| १६ | २२ फेब्रुवारी २०१२ | सांस्कृतिक अमावस्या | एकांकिका – लाईफ पनीशमेंन्ट<br>सादरकर्ते – प्रकाश शांताराम पवार<br>एकांकिका – शिखंडी<br>सादरकर्ते – सुभाष सूर्यवंशी |
| १७ | २१ मार्च २०१२ | सांस्कृतिक अमावस्या | सरगम प्रस्तुत प्यार भरे गीत हिंदी चित्रपटातील श्रवण गीतांचा श्रवणीय कार्यक्रम<br>सादरकर्ते – श्री. विजय खेर, सरगम सहप्रवासी |
| १८ | २२ मार्च २०१२ | सांस्कृतिक अमावस्या | धो धो हसा ! ध्यानस्त बसा !<br>सादरकर्ते – श्री. मधुकर सामंत |

***अभिनंदनीय -***

***खोखो :*** मुंबई जिल्हा कुमार/ कुमारी गट संघात मंडळाचे – कु. अभिषेक कागडा , कु. केदार शिवलकर, कु. मधुरा पेडणेकर, कु. श्रद्धा नमसले, कु. तन्वी उपळकर यांची निवड झाली.

***खुला गट (पुरुष)***

१) अनिकेत आडारकर : कर्नाटक

***खुला गट (महिला)***

१) श्रद्धा नमसले : नाशिक २) भाई नेरुरकर : चषक – सांगली

***ज्युनिअर गट (मुली) :-*** १८ वर्षाखालील मुंबई संघात श्रद्धा नमसले – उपकर्णधार, तन्वी उपळकर, मधुरा पेडणेकर यांची निवड झाली. स्पर्धा सांगली येथे नोव्हेंबर २०११ मध्ये झाली.

***सब ज्युनिअर गट (मुली)*** लातूर येथे झालेल्या जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेसाठी मधुरा पेडणेकर – उपकर्णधार, तन्वी उपळकर यांची निवड झाली. श्री. जतिन टाकळे ह्यांची प्रशिक्षक म्हणून निवड झाली.

***कबड्डी महिला :-*** **अहवाल काळात मंडळाच्या महिला संघाने – प्रगती क्रीडा मंडळ (लालबाग), बळीराम क्रीडा मंडळ (शिवडी), बालविकास मित्र मंडळ (काळेवाडी), अशोक क्रीडा मंडळ (नायगांव), सिद्धी स्पोर्टस् क्लब (सायन), विर संभाजी क्रीडा मंडळ (लोअर परेल) ही सहा जिल्हास्तरीय अजिंक्यपदे जिंकली.**

- मुंबई शहराचे **ज्यु. मुली अजिंक्यपद** अमर हिंद मंडळाला मिळाले.
- मुंबई शहर संघात निवड.................**दिप्ती पारकर, पूजा पाटील**
- मुंबई संघात ज्युनिअर संघात निवड........**तेजस्विनी पोटे**
- मुंबई संघात सब ज्युनिअर संघात निवड....**तेजश्री सारंग**
- मुंबई विद्यापीठ संघात निवड..............**पूजा पाटील, हर्षदा ढेंगे**
- पुढील खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली......**दिप्ती पारकर, पूजा पाटील, प्राजक्ता कांबळी, तेजस्विनी पोटे, मानसी गायकवाड, मंजीरी शिर्सेकर, हर्षदा ढेंगे**

***कबड्डी (पुरुष) :-***

देवगड (जामसांडे) येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत अजिंक्य पद व शिस्तबद्ध संघाचे पारितोषिक उपरोक्त स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडू – स्वप्नील पेडणेकर, ओम ज्ञानदीप क्रीडा मंडळ आयोजित ५५ किलो वजनी गट स्पर्धेत अजिंक्यपद स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचे बक्षीस अक्षय शेवडे यांस तर उत्कृष्ट पक्कडचे निलेश पवार यांस मिळाले.

मुंबई शहर किशोर गटात कु. अक्षय सोनी ह्याची निवड झाली त्याचप्रमाणे विविध स्पर्धांमध्ये पुढील खेळाडूंनी विशेष छाप पाडली......साईनाथ काळसेकर, प्रसाद गुरव, स्वप्निल पेडणेकर, अक्षय शेवडे, नीलेश पवार, अमित चव्हाण इत्यादी.

***विशेष अभिनंदनीय :-***

- मंडळाचे विश्वस्त **श्री. दिनकरराव पाटील यांना " रायगड भूषण "** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंतराव भालेकर यांना मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाने त्यांच्या क्रीडा विश्वातील बहुमोल योगदानाबद्दल **"जीवन गौरव"** मानपत्र प्रदान केले.
- कु. शंतनु रांगणेकर यांनी अभिनयासाठीचा **राष्ट्रीय पुरस्कार** तसेच पोगो वाहिनीचा **"एक्स्ट्रा ऑर्डिनरी चाईल्ड"** हा पुरस्कार मिळविला.
- चतुर चौकडी या दूरदर्शन मालिकेत शंतनु रांगणेकर, कौस्तुभ चौधरी, मेहुल बंदरकर, जुई सावंत, सीमा पारकर, चंदन जमदाडे, योगेंद्र माने, जितेंद्र आगरकर इत्यादी मंडळाच्या कलाकारांनी कामे केली.

## इतर संकीर्ण:-

- अहवाल काळात मंडळाच्या कार्यालयाचे अध्ययावत नुतनीकरण करण्यात आले.
- अहवाल काळात सभागृह मैदान यांची निगा राखण्यासाठी आवश्यक कामे करुन घेण्यात आली.
- अहवाल काळात कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्यात आली.
- प्रतिवर्षाप्रमाणे स्वातंत्र्यदिनी माजी अध्यक्ष कै. मधुकर ज. फडके यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस देऊन गौरविण्यात आले.
- प्रतिवर्षाप्रमाणे तहह्यात सभासद, आजी माजी खेळाडू हितचिंतक यांना दिवाळीची भेटकार्डे मंडळाच्या वतीने पाठविण्यात आली.
- खेळाडूंना, कर्मचाऱ्यांना गणवेश देण्यात आले.
- राज्यपातळीवर तसेच राष्ट्रीय पातळीवर जिल्ह्याचे, राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळाच्या खेळाडूंना अनुक्रमे ५००/– व १०००/– रुपये अनुदान देण्याच्या निर्णयाप्रमाणे अनुदान सुरु ठेवण्यात आले आहे.
- इंडियन असोसिएशन फॉर दि. हेण्डीकॅप या संस्थेला १५००/– रुपये देणगी देण्यात आली.
- नॅशनल सोसायटी फॉर दि ब्लाईड या संस्थेला १०००/– रुपये देणगी देण्यात आली.
- महानगर पालिका निवडणूक मतदान कामासाठी मंडळाची जागा देण्यात आली.

*खालील संस्थांना, व्यक्तींना विनामूल्य / सवलतीच्या दरात सभागृह देण्यात आले.*

१) विश्वस्त दिनकरराव पाटील यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त मंडळाचे सभागृह विनामूल्य देण्यात आले. दि. १६ मे २०११

२) कार्याध्यक्ष चिंतामणी नागले यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त मंडळाचे सभागृह विनामूल्य देण्यात आले. दि. २५ डिसेंबर २०११

भाटिया भुवन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांना चित्रकला स्पर्धेसाठी ब्रह्मविद्या साधक संघ यांना ब्रह्मविद्येचा प्रसार व प्रचार याकरिता, सी. के. पी. एज्युकेशन डॉ. सी. डी. देशमुख विचारमंच यांना अर्थसंकल्पा वरील परिसंवादासाठी, गो त अध्यापक मंडळ यांना वार्षिक पारितोषिक समारंभासाठी, शिवनाथ शिक्षण प्रसारक संस्था यांना वार्षिक पारितोषिक समारंभासाठी सभागृह सवलतीच्या दरात देण्यात आले.

या व्यतिरिक्त काही सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यक्रम मंडळाच्या सभागृहात झाले. त्यापैकी आयडियल बी. एन. लोकमत या वाहिनीतर्फे विविध क्षेत्रातील नामवंत महिलांसाठी आयोजित केलेली रंगपंचमी, झी मराठी वाहिन्यांच्या एका लग्नाची दुसरी गोष्ट या मालिकेच्या पहिल्या भागाचे थेट प्रसारण. श...शेअर बाजाराचा या संस्थेचा श्री. चंद्रशेखर ठाकूर यांनी सादर केलेला शेअर बाजारातील गुंतवणूकीवरील मार्गदर्शनपर कार्यक्रम.

## समारोप :-

मंडळाचे क्रीडाविभाग प्रमुख श्री. दीपक पडते क्रीडाविभागाची जबाबदारी समर्थपणे पेलीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विजय राणे कबड्डीचे तर श्री. प्रफुल्ल पाटील, श्री. संजय पेडणेकर खोखो तसेच श्री. निकेश धुरी, श्री. अमित संत, श्री. जतिन टाकळे, श्री. निलेश सावंत हे व अन्य खोखोचे प्रशिक्षक म्हणून दैनंदिन सराव घेत आहेत.

कलाविभागाची जबाबदारी कलाविभाग प्रमुख श्री. दत्ता सावंत यांनी योग्य प्रकारे सांभाळली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक नवीन कलाकार, कार्यकर्ते तयार होत आहेत.

* कलाविभाग प्रमुख दत्ता सावंत यांच्याबरोबर लीला हडप, माने, अंनत घोगळे, संजय भाटकर, सीमा पारकर, चंदन जामदांडे, जितेंद्र घोगळे, अमित सोलंकी इत्यादी कार्यकर्ते मंडळाच्या सर्वच कार्यक्रमांच्या आयोजनामध्ये साहाय्य करीत असतात.
* अहवाल काळात कलाविभागाने पर्यावरणाचे महत्व पटवून देणारे 'आली आली हो मुंबादेवी' हे मुक्तनाट्य मुंबई आकाशवाणी, संभाजी नगर, अशोकवन बोरीवली येथे संदेश प्रतिष्ठान यांच्या सौजन्याने तर माहुल

व्हिलेज चेंबूर येथे संवर्धन प्रतिष्ठान यांच्या सौजन्यानेसादर करण्यात आले.

* महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत बालनाट्य सादर करण्यात आले.
* उत्तुंग एकांकिका स्पर्धा, अद्वैत एकांकिका स्पर्धा यांमध्ये "चौकट" एकांकिका सादर केली.

मंडळाच्या लिपीक सौ. स्नेहा तेंडुलकर, कर्मचारी श्री. संदीप चांदे, श्री. रविंद्र भुवड यांचे दैनंदिन कामकाजात तसेच वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रम उपक्रमांत योग्य सहकार्य मिळत आहे.

मयुर कॅटरसचे श्री. अविनाश पाटील,श्री. मयूर पाटील यांचे वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमात व उपक्रमांत मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

पुढील वर्षभरात अनेक उपक्रम, कार्यक्रम होणार आहेत. सर्व तहहयात सभासदांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा.

अमर हिंद मंडळाचा कार्यभार सांभाळण्यासाठी तसेच कार्यक्रमांचे प्रमाण वाढलेले असतानाही ते नीट आयोजित करण्यासाठी सर्व पदाधिकारी, समिती सदस्य, खेळाडू, कलाकार, कार्यकर्ते वेळोवेळी सहकार्य करीत असतात. त्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञतेची जाणीव व्यक्त करताना मला आनंद होत आहे.

अहवाल कालावधीत आयोजित केलेल्या कार्यक्रमांत सहभागी होऊन सभासदांनी दिलेले सहकार्य तसेच कार्यकर्ते, हितचिंतक, कलाकार, खेळाडू व मंडळाचे कर्मचारी यांनी दिलेले सहकार्य यांचा पुन्हा एकदा कृतज्ञता पूर्वक उल्लेख करुन आणि पुढील वाटचालीत या सर्वांचे सहकार्य मिळेल अशी सदिच्छा व्यक्त करुन हा अहवाल समाप्त करीत आहे.

कळावे लोभ असावा आणि तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
अरुण अ. देशपांडे
कार्यवाह

## भावपूर्ण श्रद्धांजली



अमर हिंद मंडळाच्या संस्थापकांपैकी एक, माजी आमदार, प. पू. साने गुरुजी यांचे शिष्य, समाजसेवक, दादर भूषण प्रकाशभाई मोहाडीकर यांचे शनिवार, दि. १९ मे २०१२ रोजी दुःखद निधन झाले.

अमर हिंद मंडळासारख्या समाजसेवी संस्थेच्या स्थापनेमध्ये तसेच जडणघडणीमध्ये सक्रीय सहभाग असलेल्या प्रकाशभाईसारख्या थोर व्यक्तीचे निधन ही कधीही भरुन न येणारी उणीव आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही अमर हिंद मंडळातर्फे प्रार्थना !

## -: श्रद्धांजली :-

अनेक वर्ष कार्यकारी समिती सदस्य असलेले चारुदत्त थरवल, निवडणूक अधिकारी म्हणून मंडळासाठी काम पहाणारे समाज सेवक डॉ. अनिल वाकणकर, तसेच अहवाल काळात निधन पावलेल्या मंडळाच्या ज्ञात अज्ञात सभासद, हितचिंतक, कार्यकर्ते यांना अमर हिंद मंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली

# (परिशिष्ट 'अ')

## कार्यकारी समितीच्या १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२

### सभा उपस्थितीची माहिती

### एकूण सभा १२

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. चिंतामणी नागले | (कार्याध्यक्ष) | ०९ |
| २) | श्री. दीपक पडते | (कार्योपाध्यक्ष) | १२ |
| ३) | श्री. अरुण देशपांडे | (कार्यवाह) | १२ |
| ४) | श्री. सतीश रेडीज | (सहकार्यवाह) | ११ |
| ५) | श्री. श्रीकृष्ण राणे | (कोषाध्यक्ष) | ११ |
| ६) | श्री. संजय पेडणेकर | (सदस्य) | ११ |
| ७) | श्री. विजय राणे | (सदस्य) | १० |
| ८) | श्री. दत्ता सावंत | (सदस्य) | ११ |
| ९) | श्री. प्रफुल्ल पाटील | (सदस्य) | ११ |
| १०) | श्रीमती नीलिमा पालकर | (सदस्य) | ०२ |
| ११) | श्रीमती सीमा कोल्हटकर | (सदस्य) | ०७ |
| १२) | श्री. दीपक नाडकर्णी | (सदस्य स्वीकृत) | ०६ |
| १३) | श्री. विलास कारेकर | (सदस्य स्वीकृत) | ०९ |

# Report of an Auditor Relating to Accounts Audited under Sub-Section (2) of Section 33 & 34 and Rule 19 of the Bombay Public Trusts Act.

Registration No. : F-43 (Mumbai)
Name of the Public Trust : Amar Hind Mnadal
For the year ending : 31st March, 2012

| | | |
|---|---|---|
| (a) | Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules. | Yes |
| (b) | Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts | Yes |
| (c) | Whether the cash balance and the vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts. | Yes |
| (d) | Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him | Yes |
| (e) | Whether a register or movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office, and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with; | No |
| (f) | Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him | Yes |
| (g) | Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust | No |
| (h) | The amounts of outstandings for more than one year and the amounts written off; if any ; | |
| (i) | Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000/- | Yes |
| (j) | Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of section 35; | No |
| (k) | Alienations, if any, of the immovable property contrary to the provisions of Section 36 which have come to the notice of the auditor; | No |
| (l) | All case of irregular, illegal or improper expenditure, failure, omision, loss or waste was caused in consequence of breach of trust or mispplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust; | No |
| (m) | Whether the budget has been filed in the form provided by rule 16A; | Yes |
| (n) | Whether the maximum and minimum number of the trustees is maintained | Yes |
| (o) | Whether the meetings are held regularly as provided in such Intrument; | Yes |
| (p) | Whether the minute books of the proceedings of the meeting is maintained | Yes |
| (q) | Whether any of the trustees has any interest in the investment of the trust; | No |
| (r) | Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust; | No |
| (s) | Whether any of the irregularities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of audit; | NA |
| (t) | Any special matter which the auditor may think fitor neccessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner. | No |

Mumbai
Dated : 27 July 2012

**SARAF GURKAR & ASSOCIATES**
Chartered Accountants
Auditors



मंडळाचे अध्यक्ष वसंतराव भालेकर यांना जीवनगौरव मानपत्र, अमृत सन्मानचिन्ह व शाल देवून सन्मानित करताना प्राचार्य सुधीर चितळे व मा. विजयसिह पाटणकर



मंडळाचे विश्वस्त दिनकरराव पाटील यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे अभिनंदन करताना पदाधिकारी, कार्यकारी समिती व कार्यकर्ते




मंडळाचे कार्याध्यक्ष चिंतामणी नागले यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे अभिनंदन करताना पदाधिकारी, कार्यकारी समिती, कार्यकर्ते आणि प्रमुख पाहुणे मा. प्रकाशभाई मोहाडीकर




विनायक पाटील स्मृती मंच संस्थेने अमर हिंद मंडळाला 'समाजसेवी संस्थेचा' पुरस्कार जाहीर केला. सुप्रसिद्ध अभिनेते डॉ. हेमू अधिकारी यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना कार्याध्यक्ष चिंतामणी नागले आणि कार्यवाह अरूण देशपांडे



प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहुणे डॉ. विठ्ठल प्रभू
यांचे स्वागत करताना कार्यवाह अरूण देशपांडे
कार्याध्यक्ष चिंतामणी नागले व
उपाध्यक्ष रमेश वरळीकर



६४ व्या वसंत व्याख्यानमालेचे उद्घाटक
मा. उत्तम कांबळे यांचे स्वागत
करताना विश्वस्त दिनकरराव पाटील,
अध्यक्ष वसंत भालेकर,
कार्याध्यक्ष चिंतामणी नागले.




आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत प्रमुख पाहुण्या
जिल्हा क्रीडा अधिकारी कु. स्नेहल साळुंखे
विजेत्यांना पारितोषिक प्रदान करताना, सोबत
कार्यवाह अरूण देशपांडे, उपाध्यक्ष
रमेश वरळीकर क्रीडा विभाग प्रमुख
दीपक पडते, कार्यकारी सदस्य प्रफुल्ल पाटील



सन्मीत्र संघ, जामसांडे (देवगड) आयोजित
राज्यस्तरीय पुरूष गट कबड्डी स्पर्धेत अजिंक्यपद
मिळविलेला अमर हिंद मंडळाचा पुरुष संघ